# शिबिरे व नाट्यशिक्षण

## अशोक दामोदर रानडे

(मूळ प्रसिद्धी - भरतशास्त्र, अक्षर दिवाळी - १९८०)

गेल्या अर्धशतकात परस्पर-संपर्काच्या माध्यमांचा आणि साधनांचा सुकाळ झाला. याचे परिणाम अनेक क्षेत्रांत आणि अनेक अंगांवर झाले. आजच्या आख्यानापुरते बोलायचे तर अध्ययन, अध्यापन, सराव आणि सादरीकरण अधिक परिणामकारक रीतीने करण्याच्या दृष्टीने बऱ्याच अंशाने अनुकूल म्हणता येईल, अशी परिस्थिती यामुळे निर्माण झाली. साखळी-परिणाम म्हणता येईल असा पुढचा परिणाम असा की एकंदरीने शिक्षण ही प्रक्रियाच मुळी अनेक तऱ्हांनी सिद्ध करण्याचा मांड मांडला जाऊ लागला. अभ्यासगट, परिसंवाद, कार्यक्रम, चर्चा, निबंधवाचन इत्यादी आयोजण्यात शिक्षण-प्रक्रिया बहुमुखी होऊ लागली. प्रशिक्षणशिबिरे हा उपक्रमसुद्धा नवीन शिक्षणमार्ग धुंडाळण्याच्या उर्मीचेच फलित होय.

या सायक्लोरामावर इथे पाहावयाचे आहे ते नाट्यप्रशिक्षण शिबिरांचे कार्य. शासन, निमसरकारी संस्था, खाजगी संस्था, संस्थेसारख्या बळाने खपणाऱ्या व्यक्ती अशा अनेक गुमास्त्यांकरवी आता दर पावसाळ्यात वगैरे 'नेमेची' शिबिरे उभारली जातात. एक संचालक, आमंत्रित व्याख्याते, शिबिरार्थींचा एकांकिकेचा सुविहित प्रयोग, त्यांना प्रमाणपत्रे इ., शिबिरे कशी उपयुक्त ठरतात यासंबंधीची थोडथोडी भाषणे असे एकूण रसायन सिद्ध होते. सोहळा पार पडतो आणि आयोजक निःश्वास सोडतात. या सर्व खटाटोपाचा ताळेबंद काय दर्शवितो?

यंत्राच्या कार्यक्षमतेशिवायचा यांत्रिकपणा म्हणजे ही शिबिरे. मुख्य कारण म्हणजे शिबीर संचालकांना शिबीर काय चीज आहे याचे आकलनच झालेले दिसत नाही. शिबीर ही एक शिक्षण-पद्धती आहे. व्यावसायिक गुणवत्ता मिळवू पाहणारे, अखंडपणे वर्षानुवर्षे निवांतपणे शिकण्याची संधी न मिळाल्याची तूट भरून काढू अशी उमेद बाळगणारे आणि जमल्यास धंदेवाईकपणाकडे वळण्याची स्वप्ने रंगवणारे नाटकवेडे शिबिरार्थी यात मर्यादित काळ एकत्रित येत असतात. म्हणजे पुऱ्या करायच्या शैक्षणिक गरजा, वापरायच्या पद्धती इत्यादी बाबतीत नवीन पठडी शिबिरांच्या संदर्भात पकडावी लागते. त्यात पुन्हा नाटक ही प्रयोगसिद्ध कला. एकसारखी गाठ पडते ती सवयीचे समूह बाळगणाऱ्या व्यक्तिमनाशी. या बाबींचे भान अजूनही संचालकांना झालेले नाही. नाहीपेक्षा पटापट तज्ज्ञांना पकडून 'व्याख्यानां'नी वेळापत्रके भरून काढण्याचा त्यांनी सपाटा लावला नसता! लहान मुलांना बराच काळ सोईस्करपणे अडकवून ठेवणे हे बालवाडीचे कार्य होय असे मानणारे बरेच पालक आजही भेटतात. त्याच चालीवर भरपूर विषयांवरची, भरगच्च व्याख्याने भरली की शिबिरार्थी 'बिझी' राहतात अशी संचालकांची प्रगत धारणा असते. यात सन्माननीय अपवाद असेही संचालकच असतात. ते सर्व विषय स्वतःच शिकवतात! ठळठळीतपणे जाणवणारी बाब अशी की संचालकांना शिक्षण-प्रक्रियेत रस नसतो. तिचे बदलते स्वरूप ध्यानात घेऊन नाट्यशिक्षण-प्रक्रियेत मनःपूर्वक घुसण्याइतका त्यांच्यात जोम राहिलेला नसतो. फावल्या वेळात करायचा जोडधंदा इतकेच त्यांच्यालेखी शिबिराचे महत्त्व असते. शिबिरार्थ्यांचा दर्जा, त्यानुसार बदलावी लागणारी शिक्षण-सामुग्री व पद्धती इ. बाबींना न्याय देण्यासाठी आवश्यक तो मानसिक लकचिकपणा संपूर्णतया नसलेले संचालक शिबिरे फार ढोबळपणे हाताळतात.

संचालकांना शिक्षणदृष्टी नसते हे सोडा. त्यांच्या नाट्यदृष्टीचे काय? खरे पाहता दोन्हीतला कार्य-कारण भाव इतका घट्ट आहे की, एक नाही म्हणजे दुसऱ्याचा अभावसुद्धा गृहीत ठरतो. पण जरा तपशील नोंदवायचा तर असे म्हणता येईल की संचालकांच्या नाट्यदृष्टीत एक प्रकारचा घाबरटपणा असतो. म्हणजे असे की संचालकाला स्वतःला ज्या नाट्यांगात बऱ्यापैकी गती असते (उदा.

अभिनय, दिग्दर्शन इ.) त्याविषयी निराळी भूमिका असणाऱ्याचे, त्याचप्रमाणे या खेरीजच्या इतर अंगाचा खास अभ्यास करणाऱ्यांचे संचालकांना वावडे असते. शिबिराची आखणी, शिबिरात निवडल्या जाणाऱ्या एकांकिका इत्यादी साऱ्या बाबतींत संचालकांच्या समग्र नाट्यसंबद्ध जाणिवेचे भेदरलेपण स्पष्ट दिसते. संचालक सर्वज्ञानी नसतो. असण्याची गरजही नसते. उलटपक्षी आजचा शिबिरार्थीही नाट्याबाबत संपूर्ण कोरा नसतो. मुद्दा असा की विरोधी भूमिकांचे परस्पर तणाव, उलट-सुलट भाष्यातून नाट्यावर पडणारे प्रकाशझोत, निरनिराळ्या विचारपद्धतींमुळे शिक्षण-प्रक्रियेला पडणारे पैलू या सर्वांतच एक शिक्षणनाट्य आहे आणि ते समोर आले पाहिजे. हे नाटय लक्षणीय न वाटणारे संचालक आज कालबाह्य झाले आहेत. नाट्याचे स्वरूप बदलते आहे आणि शिक्षणाच्या स्वरूपात फरक झाला आहे, तेव्हा नाट्यशिक्षणाचेही स्वरूप बदलायला हवे; हे साधे समीकरण मांडण्याची तसदी घेणारे संचालक दुर्मिळ व्हावेत ही दुःखान्तिकाच म्हटली पाहिजे.

संचालक आणि संचालन याविषयी आणखी बरेच लिहिता येण्यासारखे आहे. पण मुख्य आक्षेप वर आलेलेच आहेत. तेव्हा आता शिबिरार्थी पाहू.

अनेकदा शिबिरार्थी 'बिचारे'च असतात. एका प्रकारचे 'बिचारे' आपण बरेच कोणीतरी आहोत या समजाचे सुखद पांघरूण घेऊन आलेले असतात. दुसऱ्या प्रकारचे 'बिचारे' भाबड्या कौतुकाचाच स्वर लावून वावरतात. दोन्ही प्रकारच्या बिचाऱ्यांना शिबिरातून काहीही मिळवणे मुष्कील होऊन बसते. नम्रपणे घ्यावे आणि ठामपणे विचारावे अशी बैठक घेणारे शिबिरार्थी विरळा. भरीला भर म्हणून शहरी आणि बिनशहरी असाही फरक असतो. म्हणजे वळणावर येणारच नाही इतका नाठाळ शिबिरार्थी फार क्वचित आढळत असूनसुद्धा शिबिरात येणे व शिबिरातून जाणे या दोन्हींचा टिकाऊ असर शिबिरार्थ्यांवर काहीच होत नाही.

शिबिरार्थ्यांना काही घेता न येण्याचे दुसरे एक कारण आहे. त्यांची वृत्ती जराशी अकरणशील असते. शिबीर हे एक 'मोसमी' कामकाज नसून पुढे अखंडपणे करत राहण्याच्या साधनेची ती एक सुरुवात आहे, हे त्यांना उमगत नाही. शिबिरात नाटिकेत छोटीमोठी भूमिका गाजवणे, रात्रंरात्र जागणे, खूप नाटके पाहाणे, खाणेपिणे, भटकणे इत्यादी 'एक्स्ट्रा-करिक्युलर' चळवळीत चंटपणा सिद्ध करणे, हे शिबीर सुफळ-संपूर्ण करण्याचे मार्ग नाहीत. स्वतःच्या नाट्यविषयक कल्पनांना कसोटी लावणे, दुसऱ्यांच्या कल्पनांना वाव देणे यासारख्या बौद्धिक कामगिरीबरोबर विशिष्ट नाट्यांगाच्या कसोशीने केलेल्या अभ्यासाद्वारा नाट्यविश्वाचा वेध घेऊ पाहाणे म्हणजे शिबिरात कार्यशील घटक म्हणून वावरणे होय. शिबिरार्थींना हे आकळले असेलच तर बारकाईने शोधल्यावरच त्याचा पत्ता लागतो.

पण पुन्हा आपण संचालनाकडेच येतो. कारण शिबिरार्थ्यांना आपल्या दुबळ्या अंगांची जाणीव टिकाऊपणे होणार ती शिबिराच्या कार्यवाहीतूनच. या कार्यवाहीनेच त्यांच्यात 'कलात्म अस्वस्थपणा' निर्माण होईल. प्रयोगसिद्ध कलांबाबतचे एक निखळ सत्य असे असते की या कलांमध्ये अज्ञानापेक्षा अक्षमता हाच मोठा दोष असतो. आणि हा दोष उमगतो तो ज्याला 'मेहनत' म्हणता येईल त्या, बऱ्याच अंशी कंटाळवाण्या आणि निदान वरवर पाहाता तरी निष्फळ भासणाऱ्या; 'ड्रिलिंग'मधूनच. पूर्वी हे 'ड्रिलिंग' नाटक कंपन्यांत होई. गुरुकुल पद्धतीने संगीत शिकणाऱ्यांना ते आजही करावे लागते. त्याची जागा चटपट चर्चा व किंचित अल्पावधीच्या सुविहित प्रयोगांनी भरू पाहाणे हे गाढ नेणतेपण होय. ढोरमेहनत टाळण्याच्या व पद्धतशीर शिक्षण देण्याच्या आकर्षक घोषणेचा ताईत-गंडा वापरण्याच्या चुका भोवल्याशिवाय राहात नाहीत. दुबळे आवाज, निष्प्रभ भाषण, यांत्रिक अभिनय आणि साचेबंद नाट्यदृष्टी यांना आजच्या नाट्यशिबिरांतून काळजीपूर्वक खतपाणी घातले जात आहे. याची जाणीव शिबिरार्थी, आयोजक, संचालक वा प्रेक्षक यांपैकी कोणालाच होत नसावी असे मानण्याचा मला धीर होत नाही!

आज शिबीर भरवायचे तर कोणती पथ्ये पाळावी यासंबंधी काही सूत्र नोंदवितो :

(१) तीन महिन्यांपेक्षा कमी मुदतीचे शिबीर नको. नाट्यशिक्षण देणे म्हणजे संबंधित सवयींचा संच बदलणे. याला जो काळ लागणार आहे तो लागणारच. त्यात काटछाट करणे ही फसवणूक आहे.

(२) फावल्या वेळात संचालकांचा झगा चढवणारे संचालक खड्यासारखे वगळावेत.

(३) 'नाट्य' या कलेचे 'विहंगम' दृश्य दाखवणारी सर्वसाधारण शिबिरे ही नाट्य या विषयांचे कुतूहल वाटणाऱ्यांसाठी ठीक आहेत, पण यांच्याच जोडीला विशिष्ट नाट्यांगांबाबत कसोशीने मेहनत करून घेणारी 'खास' शिबिरे असली पाहिजेत. शिबिरे पण अनेक पातळ्यांवर हवीत.

(४) व्याख्याने बंद. नाट्यसाहित्याचा आढावा इ. विषय हद्दपार. कार्यसत्र हीच शिबिरांची पद्धती हवी. 'लिहिणे-बोलणे' उदंड झाले. आता प्रयोग हवा.

(५) निदान स्थिरपद, जबाबदार संस्थांनी खास नाट्यांगनिहाय शिबिरे वाटून घ्यावीत. आखणी, राबवणूक, तपासणी व पुन्हा आखणी इ. व अशी चक्रे पाच-एक वर्ष फिरवल्यानंतरच निश्चित फलिते हाती लागतील. ही शिक्षण-प्रक्रिया आहे. यावर भरवसा नसेल त्यांनी या फंदात पडू नये. इति, नाट्यशिक्षण-शिबीर-विचार, प्रथम समास संपूर्ण.

---